N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण **P.S.(ठाणे):** वैजापूर **Year (वर्ष):** 2019
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0245 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/07/2019 05:25 बजे

2. **S.No. (अ.क्र.) Acts (अधिनियम) Sections (कलम)**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 15/07/2019
   **Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 15/07/2019
   **Time From (वेळेपासून):** 15:25 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 15:25 बजे

   **(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 16/07/2019 **Time (वेळ):** 05:12 बजे

   **(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
   **Entry No. (नोंद** 009 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/07/2019 05:12 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**
   1. **(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 0.5 किमी
   **Beat No. (बिट क्र.):**

   **(b) Address (पत्ता):** वैजापुर ,वैजापुर

   **(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
   **(a) Name (नाव):** जयराम मोहन उगले
   **(b) Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**
   **(c) Date/Year of Birth (जन्म** 1991 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
   **(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**
   **(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**
   **Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**
   **(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

   **(h) Address (पत्ता):**



Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | दहेगाव ,वैजापुर ,वैजापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | दहेगाव ,वैजापुर ,वैजापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9011213053

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गणेश तुळशीराम पाटील | | | 1. पोलीस ठाणे वैजापुर ,वैजापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

दि.16/07/2019 मी जयराम मोहन उगले वय-28 वर्ष व्यवाय-शेती,रा.दहेगाव ता.वैजापुर जि.औरंगाबाद मो.क्र. 9011213053मी दिनांक 15/07/2019 रोजी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरगाबाद येथे हजर येवुन तक्रार दिली होती की मी वरील ठिकाणचा राहणारा असुन शेती व्यवसाय करतो.मला दोन चुलते आहेत त्यापैकी नामे 1) रमेश मार्तंड उगले 2)श्री.रंजक मार्तंड उगले असे आहेत आम्ही सर्व वेगवेगळे शेजारी राहतो.माझे चुलते श्री.रंजक मार्तंड उगले हे हाताने अपंग आहेत. त्यांना दोन मुले नामे 1) भगीरथ रंजक उगले 2)अमरणाथ रंजक उगले असे आहेत.माझ्या चुलते नामे श्री.रंजक उगले हे अपंग असल्याने मी त्यांचे बाहेरील व्यवहारास मदत करतो.माझे चुलते श्री.रंजक उगले यांनी काही दिवसापुर्वी  एक सोनालीका कंपनीचा नविन टक्टर विकत घेतलेला आहे.सदर टक्टरद्वारे शेतीचे व इतर कामे होतात.माझा चुलता नामे रंजक उगले यांच्या शेतातील घराचे बांधकाम चालु आहे.त्या करीता त्यांनी आमच्या शेताचे लगत असलेल्या नदीतुन वाळु घेतलेली होती. व ती वाळु शेतातील घराच्या बाजुला बऱ्याच दिवसापासुन साठवलेली असल्याने तीच्या मध्ये माती झालेली होती. घराचे बांधकाम करण्यासाठी वाळुची अवश्यकता असल्याने माझा चुलता नामे रंजक उगले यांनी सदरची वाळु पाण्याने धुण्यासाठी ट्रक्टरच्या ट्रलीमध्ये टाकुन घरासमोरील विहीरीच्या बाजुला ट्रक्टर उभा केला होता. त्यानंतर दि.08/07/2019 रोजी वैजापुर पोलीस स्टेशन येथील पोलीस श्री.गणेश पाटील हे माझ्या चुलत्याच्या शेतात आले व त्यांनी टक्टरमधील वाळु पाहुन चुलते श्री.रंजक उगले यांना म्हणाले की,तुम्ही वाळुची चोरटी वाहतुक करता मी तुमचे ट्रक्टर पोलीस स्टेशनला घेवुन जातो व तुमच्यावर वाळु चोरीचा गुन्हा दाखल करतो.त्यावेळी मी सुध्दा शेतातील घरी होतो. मी व माझ्या चुलत्यांनी पोलीस श्री. गणेश पाटील, यांना सांगीतले की,आमच्या शेतातील घराचे बांधकाम चालु आहे. ही वाळु एक वर्षापासुन आमच्या शेतात पडुन आहे. त्यामध्ये माती झालेली असल्याने सदरची वाळु धुण्यासाठी ट्रालीमध्ये टाकलेली आहे.असे सांगीतले त्यावरही श्री. गणेश पाटील यांनी आमचे ए◌ैकले नाही.तसेच पोलीस श्री.गणेश पाटील मला म्हणाले की, तुम्हाला मला 50,000/-रुपये दयावे लागतील नसता तुमच्या ट्रक्टरवर वाळु चोरीचा गुन्हा दाखल करील असे म्हणाले असता आम्ही त्यांना खुप विनवणी केली परंतु त्यांनी आमचे काहीएक ए◌ैकले नाही.त्यानंतर पोलीस श्री.पाटील यानी माझ्या चुलत्याचे वाळुने भरलेला ट्रक्टर पोलीस स्टेशन वैजापुर येथे घेवुन गेले व दि.09/07/2019 रोजी माझ्या चुलत्याचे वाळुने भरलेल्या टक्टरवर व माझा चुलत भाऊ नामे अमरणाथ रंजक उगले यांचे विरुध्द वाळु चोरीचा गुन्हा दाखल केला. त्यानंतर पोलीस,श्री.गणेश पाटील, यांनी मला पोलीस स्टेशन वैजापुर येथे बोलावुन घेतले व मला म्हणाले की, मी ट्रक्टरवर व तुमच्या चुलत भावावर गुन्हा दाखल केला आहे. आता तुमच्या चुलत्याला पण गुन्हयात घेतो असे म्हणाले.त्यावर मी श्री.पाटील यांना म्हणालो की, साहेब माझे चुलते हाताने अपंग आहेत.त्यांना कश्याला गुन्हयात घेता.तेव्हा पोलीस श्री.गणेश पाटील मला म्हणाले की,तुम्ही तुमच्या भावाला आमच्याकडे हजर करा मी त्यांला गुन्हयात मदत करतो व ट्रक्टर सोडण्या साठी मदत करतो त्यासाठी तुम्हाला मला 15,000/-रुपये दयावे लागतील मी पोलीस श्री. गणेश पाटील यांना म्हणालो साहेब,माझे चुलते गरीब आहेत त्यांच्याकडे एवढे पैसे नाही.त्यावर पोलीस श्री.गणेश पाटील, मला म्हणाले की,



Scanned by CamScanner

तुम्ही जर मला 15,000/-रुपये नाही दिले तर मी तुम्हाला तुमच्या चुलत भावा विरुध्दच्या गुन्ह्यात मदत करणार नाही व त्यांचा ट्रक्टर सोडण्यास मदत करणार नाही. तेव्हा मी श्री.गणेश पाटील यांना नाईलाजाने हो म्हणुन निघुन आलो आहे. माझी पोलीस श्री.गणेश पाटील, यांना लाच देण्याची ईच्छा नाही. पोलीस श्री.गणेश पाटील यांचे सोबत माझा उसनवारीचा किंवा देण्याघेण्याचा काही एक व्यवहार नाही. तसेच माझी त्यांचेशी काहीएक वैर-दुष्मनी नाही.मी आज दिंनाक 15/07/2019 रोजी पोलीस श्री.गणेश पाटील,यांना भेटणार आहे.त्यावेळी माझ्या चुलत्याच्या ट्रक्टरवर पोलीस स्टेशन वैजापुर येथे दाखल गुन्ह्यामध्ये पोलीस श्री.गणेश पाटील यांनी माझ्याकडे लाचेची रक्कमेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम माझ्याकडून स्वत: अगर इतरं○ा मार्फत स्विकारल्यानंतर त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी हि विनंती.अशा आशयाची तक्रार दिल्याने ती तक्रार संगणकावर टंकलिखीत करण्यात आली त्यावर मी स्वाक्षरी केली.त्यानंतर पो.नि.क्षीरसागर यांनी मी दिलेली तक्रार पंचाना वाचावयास दिली पंचांनी ती तक्रार वाचल्यानंतर त्यावर सह्या केल्या व पो.नि.नंदकिशोर क्षीरसागर यांनी तक्रारीवर समक्ष म्हणुन सही केली. त्यानंतर पो.नि.नंदकिशोर क्षीरसागर यांनी माझ्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी दोन शासकीय पंच व पोलीस पथक असे शासकीय वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद येथुन मी सांगीतल्या प्रमाणे पोलीस स्टेशन वैजापुर औरंगाबाद ग्रामीण,औरंगाबादकडे रवाना झालो. पोलीस स्टेशन वैजापुर औरंगाबाद ग्रामीण चे अलीकडे सुरक्षीत ठिकाणी पोहचल्यानंतर पो.नि.श्री. क्षीरसागर यांनी मला व पडताळणी पथकास आवश्यक सुचना दिल्या.त्यानंतर पोनि श्री.क्षीरसागर यांचे सुचने प्रमाणे पोना/विजय बाम्हंदे यांनी डिजीटल व्हईस रेकर्डर चालु करुन माझे शर्टाचे डाव्या बाजुचे खिशात ठेवला.त्यानंतर मी व पंच क्र.1 श्री.तन्विर शेख असे पोलीस श्री.गणेश पाटील यांना भेटण्यासाठी मी उपलब्ध केलेल्या मोटर सायकलने पोलीस स्टेशन वैजापुर औरंगाबाद ग्रामीण येथे गेलो असता माझी पोलीस स्टेशन वैजापुर औरंगाबाद ग्रामीण मध्ये पोलीस श्री.गणेश पाटील यांच्याशी भेट झाली.त्यावेळी माझे व पोलीस श्री.गणेश पाटील यांच्यामध्ये कामा संबंधाने चर्चा होवुन पोलीस श्री.गणेश पाटील यांनी मला पंचासमक्ष 15,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडअंती 12,000/-रुपये लाचेची मागणी केली. व त्यापैकी दिनांक 15/07/2019 रोजी 6,000/-रुपये आणुन देण्याचे सांगीतले व उर्वरीत 6000/-रुपये वाळुचा ट्रक्टर सोडतेवेळी घेवुन येण्याचे सांगीतले. लाचेची मागणी केलेली 6000/- रुपये पोलीस श्री.गणेश पाटील यांनी पोलिस स्टेशन वैजापुर येथे घेवुन येण्याचे सांगीतले.त्यानंतर मी व पंच क्र. 1 श्री.तन्विर शेख असे सापळा पथक थांबलेल्या शासकीय वाहनाजवळ परत आलो.तेथे पोना/विजय बाम्हंदे यांनी माझ्या कडील व्हईस रेकर्डर बंद केले.त्यानंतर पो.नि.श्री.क्षिरसागर यांनी आमच्या समक्ष पंच क्र.1 श्री.तन्वीर शेख यांना लाचेच्या मागणी अनुषंगाने आमच्यात व लोकसेवक पोलीस श्री.गणेश पाटील यांच्यात काय बोलणे झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्र.1 यांनी मी वर नमुद केल्याप्रमाणे हकीकत सांगीतली. त्यानंतर पो.नि.क्षिरसागर यांनी व्हईस रेकर्डर चालु करुन आमच्यात व पोलीस श्री.गणेश पाटील यांच्यात झालेले संभाषण ऐकुन ते पंच क्र.1 यांनी सांगीतलेल्या हकीकती प्रमाणे बरोबर असल्याची खात्री करुन श्री.गणेश पाटील यांनी माझे वर नमुद कामासाठी माझ्याकडे 15,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडअंती 12,000/-रुपये लाचेची मागणी केली. व त्यापैकी दिनांक 15/07/2019 रोजी 6,000/-रुपये आणुन देण्याचे सांगीतले व उर्वरीत लाचेची रक्कम 6000/-रुपये वाळुचा ट्रक्टर सोडतेवेळी घेवुन येण्याचे सांगीतल्याचे निष्पन्न झाल्याने पोलीस श्री.गणेश पाटील यांचे विरुध्द सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले.त्यानंतर पो.नि.क्षिरसागर यांनी श्री.गणेश पाटील यांना देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणेबाबत कळविले असता मी माझेकडील 500/- रुपये दराच्या 12 चलनी नोटा असे 6,000/-रुपये त्यांचे समक्ष हजर केले. त्यानंतर मला व दोन्ही पंचांना अँथ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहीती व प्रात्याक्षीक करुन दाखवले. त्यानंतर लाचेची रक्कम 6,000/- रुपये च्या भारतीय चलनी नोटांना अँथ्रासीन पावडर लावुन श्री.गणेश पाटील यांना देण्याकरीता माझे पन्टचे समोरील उजव्या बाजुचेखिशात ठेवुन लाचेची रक्कम श्री.गणेश पाटील यांना उजव्या हाताने दिल्यानंतर डावा हात डोक्यावरुन फिरवुन सुनियोजित ईशारा म्हणुन सांगण्यात आला.त्यानंतर पो.नि.श्री.क्षीरसागर यांनी मला दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवाही बाबत योग्य सुचना दिल्या. त्यानंतर पोनि क्षीरसागर यांचे सुचनेवरुन पोना/बाम्हंदे यांनी व्हईस रेकर्डर चालु करुन माझ्या अंगातील शर्टच्या डाव्या खिशात ठेवला. त्यानंतर मी व पंच क्र.1 श्री.तन्विर शेख असे दोघेजण माझे मोटारसायकलवर पोलीस स्टेशन वैजापुर येथे गेलो असता आमचे मागुन सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने शासकीय वाहनाने येवुन पोलीस स्टेशन वैजापुर चे परिसरात थांबले.त्यानंतर पोलीस स्टेशन वैजापुर येथे गेल्यानंतर मला पोलीस श्री.गणेश पाटील दिसुन न आल्याने मी त्यांना मोबाईलवरुन संपर्क केला असता त्यांनी मला पोलीस स्टेशन समोरील पोलीस वसाहत चे परिसरात बोलावल्याने मी व पंच असे पोलीस स्टेशन वैजापुर समोरील पोलीस वसाहत कडे जात असतांना काही अंतरावर पोलीस श्री.गणेश पाटील व माझी भेट झाली.सदर भेटीदरम्यान श्री.गणेश पाटील यांचेसोबत बोलणे होवुन पो○लीस श्री.गणेश पाटील यांचे समोर मी माझे पन्टचे उजव्या बाजुचे खिशामध्ये ठेवलेली लाचेची रक्कम 6,000/- रुपये माझ्या उजव्या हाताने काढुन दिली असता पोलीस श्री.गणेश पाटील यांनी सदरची रक्कम त्यांच्या डाव्या हाताने स्विकारली व त्यांच्या नाईट पन्टचे डाव्या बाजुचे खिशात ठेवली. त्यानंतर मी 15.25 वाजेच्या सुमारास सापळा पथकास लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजीत ईशारा केला असता पो.नि.श्री.क्षीरसागर,पंच क्र.2 व सापळा पथकातील सदस्य असे पोलीस स्टेशन वैजापुर समोरील पोलीस वसाहतीचे रस्त्यावर आले.त्यानंतर माझ्या कडील व्हाईस रेकर्डर पोना/बाम्हंदे यांनी बंद करुन त्यांचे ताब्यात घेतला.त्यावेळी पो.नि.श्री. क्षिरसागर पंच क्र.1 यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली याबाबत विचारणा केली असता पंच क्र.1 यांनी समोर हजर असलेल्या ईसमाकडे हात करुन हे पोलीस श्री.गणेश पाटील असुन त्यांनी लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम आपले डाव्या हाताने स्विकारुन नाईट पन्टच्या डाव्या बाजुचे खिशात ठेवली असल्याचे सांगीतले.त्यानंतर पो.नि.श्री.क्षिरसागर यांनी त्यांना स्वत:चा परिचय देवुन श्री.गणेश पाटील यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री.गणेश तुळशीराम पाटील पोना/ 429, नेमणुक-पोलीस स्टेशन वैजापुर,औरंगाबाद ग्रामीण जि.औरंगाबाद असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर पो.नि.श्री.क्षीरसागर यांचे सुचने वरुन पंच क्र.02 श्री.दिपक चव्हाण यांनी पोलीस श्री.गणेश पाटील यांचे पन्टचे डाव्या बाजुचे खिशामधुन 6,000/-रु. लाचेची रक्कम बाहेर काढुन त्या रक्कमे तील नोटांचे नंबर पंच क्र.01 श्री.तन्विर शेख यांचे मदतीने पडताळुन पहीले असता ते तक्रारदार श्री. जयराम उगले यांनी लाच म्हणुन देणेकरीता हजर केलेल्या नोटांचे क्रमांक व वर्णनाशी तंतोतंत जुळत असल्याचे आढळुन आले.त्यानंतर तेथील आवश्यक ती प्रात्याक्षीक कार्यवाही करुन पो.नि.श्री. क्षीरसागर यांनी पुढील कायदेशिर कारवाई ला.प्र.वि.कार्यालय औरंगाबाद येथे करण्याचे ठरवुन लोकसेवक श्री.गणेश पाटील यांना ताब्यात घेवुन आम्ही ला.प्र.वि.कार्यालयात येवुन पुर्ण केली.करिता यातील लोकसेवक श्री.गणेश तुळशीराम पाटील पोना/429,नेमणुक-पोलीस स्टेशन वैजापुर,औरंगाबाद ग्रामीण.यांनी मला माझा चुलत भाऊ श्री. अमरणाथ रंजक उगले याचे विरुध्दच्या दाखल गुन्ह्यात मदत करण्यासाठी व त्यांचा ट्रक्टर सोडण्यास मदत करण्यासाठी माझ्याकडे 15,000 /-रुपये लाचेची मागणी करुन तडजोडअंती 12,000/-रुपये लाचेची मागणी केली.व त्यापैकी दिनांक 15/07/2019 रोजी 6,000/-रुपये लाचेची रक्कम आणुन देण्याचे सांगीतले. व उर्वरीत 6000/-रुपये लाचेची रक्कम वाळुचा ट्रक्टर सोडतेवेळी घेवुन येण्याचे सांगुन दिनांक 15/07/2019 रोजी 6,000/-रुपये लाचेची रक्कम पोलीस ठाणे,वैजापुर समोरील पोलीस वसाहतीचे रस्त्यावर पंचासमक्ष 15.25 वाजता स्वत: स्विकारली म्हण



Scanned by CamScanner

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): or

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे Bhagwan Babasaheb **Rank** (पद): I (Inspector)

**No.**(क्र.): DGPBBDM7401 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची
**Name** (नाव): Anant Mallipatrao Kulkarni
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):



Scanned by CamScanner